# ११. सिमला करार निषेध पोवाडा



जनगणा जनांच्या गणा । अमरवंदना । दैत्यभंजना । (विघ्ननाशना) ।
अमर तूं नायक देवांचा । मुजरा घ्यावा नम्र शरीरांचा । पुरव तूं मानस क्षणीं अमुचा ॥

घे उग्ररूप जनगणा । असुरमर्दना । धांव या क्षणा । नको तव सौम्य ध्यान आज ॥ चढव क्षणीं अंगीं युद्धसाज । देशबुडव्यांचा जिरव माज ॥

ही देशबुडव्यांची जात । करी वाताहात । देशाचा घात । हरामखोर करी (करती) स्वार्थपायीं ॥ मातृभूमीस दगा देई । फाळणीचा सुरा घुसवी हृदयीं ॥

मायभूच्या रक्तानें यांचे । रंगले पाप्यांचे । हात दुष्टांचे । तरी बेशरम सत्ता घेती ॥ बेगडी यांची देशभक्ति । थू: थू: यांच्या जिनगीवरती ॥

वरी शुभ्र वस्त्रें पांढरीं । दिसती गोजिरीं । परी अंतरीं । काळ्यापरी भाव काळा ॥ स्वार्थावर खिळे सदा डोळा । मुळाला डसला जणूं मुंगळा ॥

(चाल)

अहिंसेच्या नादानं यांनीं । केली हिंसा बघा देशाची ॥
केलं फत्ताल पाक गुंडांनीं । निष्पाप लाखो लोकांची ॥
हे कोडगे ओढती मेजवानी । तिकडे होळी घरेदारांची ॥
हे दंग नाच-गायनीं । तिकडे इज्जत गेली भगिनींची ॥

(चाल) रक्तानें हरामखोरांचे रंगले हात ॥
तरी म्हणती मिळालें स्वातंत्र्य रक्तविरहित ॥
जनगणा तुला हे कावेबाज फसवीत ॥
तूं भोळा म्हणुन ढोंग्यांना शिरीं मिरवीत ॥

(चाल) जनगणा विशालोदरा । क्षमासागरा । दिलासी थारा । गुन्हा

अक्षम्य जरी घडला । पाप्यांकडे केला कानाडोळा । भाजो-यांना माज पुरा चढला ॥ 63

यांचे गुन्हे कसे वर्णावे । जीभ खंतावे । मनें कष्टावें । भडका जाय उडून काळजाचा ॥ शत्रुपुढें गुडघे टेकण्याचा । इतिहास घडती लाचारीचा ॥

(चाल)

कितिदां यांच्या लाचारीनें लांछन तुज लागे ॥ जनगणा ॥
लाविती तुज हे दुश्मनापुढें टेकाया गुडघे ॥
काश्मीरांपुन रोळ्या हुसकण्या सिद्ध जवान होते ॥ जनगणा ॥
अवसानघात कराया सजले पंडित निज हाते ॥
घरचा तंटा नव्हाश्यावरी नेला शांतिदूतें ॥ जनगणा ॥
अपुल्यासह ठरविलें जनगणा मंदबुद्धि तूतें ॥

(चाल) तीन वेळां केलं आक्रमण । दांडगाईनं । पाकिस्तानानं । भारतावरी तुटून पडती ॥ जवान बहादुर आमचे लढती । गनीम चीं चीं करत पळती ॥

जवान आमचे बहादुर किती । रक्त सांडती । रिपुस मारती । प्राणांची बाजी लावून लढती ॥ कितीक ते पडती धारतीर्थी । जयश्री लोळे चरणांवरती ॥

जवानांनीं भान विसरून । रक्त शिंपून । प्राण अर्पून । मुक्त केलेला मुलुख युद्धांत ॥ दिवटे हे नेते परत करतात । जनगणा जाग होतसे घात ॥

(चाल) या दिवट्या पुढाऱ्यांमुळें नाश ओढवला ॥
हे ध्यान वाहिलो पाढा हानिच्या सगळा ॥
नाकर्तेपणें काश्मीरच्या भाग गमवीला ॥
तो 'श्याम' प्रसाद भूमीला पारखा झाला ॥

बहादुर लाल अंतराला मातृभूमीला ॥
स्वराज्यांत ये(ग) जवानांचा मातीमोल (कवडीमोल) ठरला ॥

(चाल) जवानांनीं विजय मिळविला । त्याला नेते बट्टा लावीत ॥
जवान किती रणावर पडला । त्याची नाहीं नेत्यांना खंत ॥
भगिनींच्या पोळ्या वापाळान्ला । हे पापी जबाबदार होत ॥
जनगणा किती रे तूं भोळा । ढोंग्यांच्या थापांना भुलत ॥
यांच्या खोट्या भाषणबाजीला । बनतोस किती हातोहात ॥

(चाल)

सासष्ट सालची पुनरावृत्ती बहात्तरीं झाली ।
जवानांच्या रक्तानें शिंपली भूमि रिपुस दिधली ॥
जवानांच्या उज्वल कीर्तीवर फिरवियला बोळा
सिमला-शिखरीं नेत्यांच्या अवलक्षणी चाळा ॥
जगज्जीवना 'राम' तुझ्यांतील मरून कीं गेला ।
स्वण पितळ हो; यश अपयशातें उनमळलें भूला ॥
(मिरचेष्ट धरणीला ॥)

सिमल्याला रंगलें शांतिचें नाटक ही मोठें ।
नाटक केवळ नाटक! त्यामधीं वास्तवता कोठें ? ॥
सूर चढवुनी देत बाईला साजिंदे साथ ।
स्पर्धा चाले तरी मारण्या अस्खलित बात ॥
जागृत करणें तुला जनगणा इथें ठरे पाप ।
देश विकाया निघती बुडवे ऊठ! सोड झोंप ॥

(चाल) हे घरच्या म्हातारीचे काळ । स्वकीयांचा छळ ।
करण्यामधीं कुशल । परकयांपुढें सदा घोळती गोंडा ॥
लाचारीनें वेंगाडती तोंडा । कृतीनें हे लाजविती षंढां ॥

नादान राज्यकर्तांना । लाळघोट्यांना । लूटचाऱ्यांना ।
जनगणा अद्दल घडवी ध्यान ॥ हातीं दे उपटून त्यांचे कान ।
राख निज अग्रपूजेचा मान ॥ (राख निज अग्रपूजा सन्मान॥)
सिमला करार घोर लांछन ।तुझा अपमान । जनगण
जाण । लागे तुज भ्याडपणाचा डाग ॥ झाडूनें नेला मुक्त
भूभाग । जरा तरी मर्दासम तूं वाग ॥

मुम्बई व डोंबिवली
रचना ९ ते १२ जुलै १९७२

(वरील पोवाडा मुंबई जनसंघानें प्रसिद्ध केला. २०.७.१९७२)